# छान छान गीतें



सौ. उषा देशमुख

REFBK-0011980
REFBK-0011980
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १५३७

# छान छान गीतें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

सौ. उषा देशमुख

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...... वि: ......
क्रमांक ...... नों दि ......
REFBK-0011980
REFBK-0011980

मूल्य रु. ५० नवे पैसे

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली :: एप्रिल १९६१

© सौ. उषा देशमुख

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनवार पेठ : पुणें २.

मुद्रक :
चिं. ग. वझे
साधना प्रेस
४३०-३१ शनवार पेठ : पुणें २.

# अनुक्रम


| | | पान |
|---|---|---|
| १. | देवदर्शन .... .... | ५ |
| २. | पंढरपूरचा विठोबा .... | ६ |
| ३. | श्रीगुरुदत्त .... .... | ७ |
| ४. | गंमत–जंमत .... .... | ८ |
| ५. | आमुची गाडी .... | ९ |
| ६. | आत्याचा बाळ .... | १० |
| ७. | घारुताई .... .... | ११ |
| ८. | मोरास — .... .... | १२ |
| ९. | शिवाजी राजा.... .... | १३ |
| १०. | भातुकली .... .... | १४ |
| ११. | आमुची बाग .... .... | १५ |
| १२. | गुढीपाडवा .... .... | १६ |
| १३. | इरलें .... .... | १८ |
| १४. | मिलिंदचा कुत्रा .... | २० |
| १५. | मुंबईची सहल ( १ ) .... | २१ |
| १६. | चित्राचें 'बालमंदिर' .... | २२ |
| १७. | मुंबईची सहल ( २ ) .... | २४ |
| १८. | बाळांचा खेळ.... .... | २६ |
| १९. | वेणीवाला .... .... | २८ |
| २०. | पाखरांचें संमेलन .... | ३० |


****

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों. दि: ...

# १ : देवदर्शन



आई जाते देवाला । हातीं घेई तबकाला ॥
काय ठेविलें तबकीं या । हळदी-कुंकू वहावया ॥

दुर्वा तुळशी फुलें पहा । गंध अक्षता बेलहि हा ॥
पूजेसाठी उदबत्ती । कापूर तैशा फुलवाती ॥

पैसा, नारळ अन् पेढे । आई ठेवी विष्णुपुढे ॥
हात जोडुनी देवाला । औक्ष मागते बाळाला ॥

* * *

# २ : पंढरपूरचा विठोबा



पंढरपुरला जाऊं या । रूप सावळें पाहूं या ॥
उभा चंद्रभागेतीरीं । पायाखाली वीट बरी ॥

हात ठेविले कटेवरीं । रखमाबाई शेजारीं ॥
कार्तिक मासीं, आषाढीं । वाजत गाजत ये दिंडी ॥

भक्तमंडळी जमलेली । भजनांमध्ये रमलेली ॥
नाम विठोबाचें घेती । मिळते त्यांना सुखशांती ॥

* * *

# ३ : श्रीगुरुदत्त



तीन शिरें अन् हात सहा । दत्तगुरूला चला पहा ॥
अत्रिमुनींचा हा बाळ । अनसूया करि संभाळ ॥

नरसोबाच्या वाडीला । कृष्णेच्या ग काठाला ॥
शंख, चक्र तीं दो हातीं । पायिं खडावा चटपटती ॥

त्रिशूळ डमरू कमंडलू । गुरूस लोटांगण घालूं ॥
औदुंबरछायेखाली । कुत्रीं गाई विसांवलीं ॥

सदैव त्यांना प्रतिपाळी । गुरुमाउली विराजली ॥
रूप मनोहर पाहूं या । सद्गुरुचरणीं वंदूं या ॥

* * *


# ४ : गंमत – जंमत



पाऊस पडतो – सर् सर् सर् ॥
मुलें धावलीं – झर्, झर्, झर् ॥
गारा पडती – टप्, टप्, टप् ॥
वेचुं लागलीं – झप्, झप्, झप् ॥
भिजलीं सारीं – सट्, सट्, सट् ॥
घरांत आलीं – पट्, पट्, पट् ॥
नाच नाचलीं – थय्, थय्, थय् ॥
मनांत वाटे – भय, भय, भय ॥
आई आली – भर, भर, भर ॥
मुलें कांपतीं – थर, थर, थर ॥
कपडे बदला – झट्, झट्, झट् ॥
खाऊ घ्या हा – चट्, चट्, चट् ॥
भीति पळाली – भुर्, भुर्, भुर् ॥
चिवडा वाजे – कुर्, कुर्, कुर् ॥

* * *

# ५ : आमुची गाडी



ही पहा आमुची गाडी। माणक्या-हिऱ्याची जोडी॥
पांढरे शुभ्र हे दोघे। जुंपितां धावती वेगें॥
धिप्पाड आमुचे बैल। शोभते तयांना झूल॥
घेतली नवी ही गाडी। दमदार गोजिरी जोडी॥
तट्टयाचें छप्पर खास। लागे न ऊनपाऊस॥
घातली खालती पेंढी। पसरली वरी पासोडी॥
त्यावरी नवी सतरंजी। बैसली अगोदर आजी॥
मग बसलीं पोरें सारीं। उधळले बैल चौखूरीं॥
चाललों वरंडोलीला। आमुच्या वतनवाडीला॥
दर्शना सोमजाईच्या। जागत्या गावदेवीच्या॥



* * *

# ६ : आत्याचा बाळ



आत्याचा हा बाळ पहा। इवला इवला छान अहा ॥
"प्रशान्त" याचें नांव असे। गोड खुदुखुदूं हा हासे॥

सुंदर गोऱ्या रंगाचा। निळसर मोठ्या डोळ्यांचा।
जावळ तुरळक पिंगटसें। हिरवळ मऊशी भासतसे ॥

हातपाय हा हलवीतो। "आंखूं आंखूं" हा म्हणतो ॥
भूक लागतां हा रडतो। दूध पिऊनी मग निजतो ॥

त्याच्या इवल्या ओठांचा। आणि गोबऱ्या गालांचा ॥
पापा घेण्या मी जातें। आई मजला दटावते ॥

चोरुनि पापा मग घेतें। "प्रशान्त" हसतां, मी हंसतें ॥
लळा लावुनी आम्हांला। "प्रशान्त" गेला गावाला ॥

* * *

ग्रंथ संग्रहालय, ठाणे १८५०
अनुक्रम 37758 दि: 3/6
क्रमांक 9239 नों: दि: 7319

# ७ : घारुताई



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
99860

"कुठे निघाली घाईनें । घारुताई ऐटीने ? ॥
येऊं का मी तवसंगें ? । मौज बघाया वरती गे ? ॥

पंखावरि मज बसवोनी । जाई मजला घेवोनी ॥
दूर दूर या आभाळीं । चांदोमामाचे जवळीं ॥


चांदोबा नच आकाशीं । घरीं तयाचे ने मजशीं ॥
चांदोबाची आई गे ! । पहावयाला मिळेल गे ! ॥

उंच जाउनी मग खाली । पाहिन माझी मी खोली ॥
दिसेल आई मज माझी । आणिक आई दादांची ॥

पाहुनि मजला हसतील । " ये ये खाली " वदतील ॥
ताई, भाऊ, अन् काका । मारतील ते मज हांका " ॥

* * *

## ८ : मोरास —



येरे मोरा ! नाचाया । मुलांमुलींना रमवाया ॥
ढग जमले हे आभाळीं । नाच नाच तूं या वेळीं ॥
उठव नाद तूं मिऊं मिउंचा । ताल धराया नाचाचा ॥
थुइं थुइं नाचत असतांना । गंमत वाटे बाळांना ॥
फुलव पिसारा तूं मोरा ! । डौल दाखवी सुकुमारा ! ॥
मोरपिसारा देवाने । रंगविला मउ कुंचलिने ॥
अंगहि सारें रंगविलें । सुंदर रंग तयांस दिले ॥
रंग संपला मग सगळा । पायांना तो नच उरला ॥
नाचत डौलाने असतां । नजर खालती मग वळतां ॥
पाय पाहुनी मोर रडे । नाच तयाचा बंद पडे ॥

* * *

# ९ : शिवाजी राजा



अमुचा राजा शूर शिवाजी । लालनपालन याचें करि जी ॥
माय जिजाई पिता शहाजी । कोंडदेव गुरुवर दादोजी ॥
सिंहापरि लढला तानाजी । पावनखिंडीमधला बाजी ॥
उजवा हात जणू येसाजी । डावा पासलकर तो बाजी ॥
सरसेनापति की नेताजी । बहुरूपी तो हेर बहिरजी ॥
असे मराठे सारे राजी । माया शिवबाचे ठायीं जी ॥
कणखर साथीदार हिरोजी । शूर मावळे ते रणगाजी ॥
माय भवानी सदैव राजी । जयजयकार करा आतां जी ॥

* * *

# १० : भातुकली



या ग मुलींनो ! खेळूं या। भातुकली ही खेळूं या ॥
खेळ पहा हा पितळेचा। संच असे सैंपाकाचा ॥
चला खेळ हा मांडूं या। साऱ्या मिळूनी खेळूं या ॥
खाऊ देईल मज आई। पोहे, गूळ नि दाणेही ॥
चला चुरमुरे आणूं या। आणिक डाळें घेऊं या ॥
होइन आई तुमची मी। करीन जेवण मी नामी ॥
गूळ घेउनी, डाळ्यांचे। करीन लाडू गमतीचे ॥
झाली दाण्यांची चटणी। भात चुरमुऱ्याचा आणि ॥
चला मुलींनो ! जेवूं या। सारें वाढुन घेऊं या ॥
झाली संध्याकाळ अतां। खाऊ थोडासा उरतां– ॥
चट्टामट्टा चला करा। खेळ आवरूं हा सारा ॥

* * *


# ११ : आमुची बाग



छानशी आमुची बाग। ही पहा फुलांची रांग॥
हा गुलाबराज टपोरा। मोगरा दाखवी तोरा॥
बघ कमान जाइजुईची। सायली, चमेली यांची॥
हा तसाच पिवळा चाफा। मधुगंधित हिरवा चाफा॥
बहरली दाट शेवंती। पांढरी तशी पिवळी ती॥
ही कलिका निशिगंधाची। मोहवी सुवासें साची॥
हीं विलायतीं फुलझाडें। रूपाने व्हावें वेडें॥
बघ तरी अबोल अबोली। रंगाने किती ही नटली॥
हा सबजा या बाजूला। तुळशीस मंजिऱ्या आल्या॥
पूजेस पान तुळशीचें। कृष्णास आवडे साचें॥

* * *

# १२ : गुढीपाडवा



गुढी पाडवा सण आला । गुढ्या-तोरणें उभवुं चला ॥
स्वच्छ धुऊनी घ्या काठी । खण बांधावा जरिकाठी ॥

साखरपदकांची गाठी । हार फुलांचा गुढिसाठी ॥
बांधा आंब्याचा टहाळा । काठीच्या त्या टोकाला ॥

उपडा गडवा त्यावरती । गुढी शोभते छान किती ॥
तोरण दारीं आंब्याचें । मंगल होवो साऱ्यांचें ॥

पानें तीं कडुनिंबाचीं । कवळीं कवळीं घ्यायाचीं ॥
धने, गूळ मग मिसळावे । अनशा पोटीं तें खावें ॥

रोग भिऊनी पळतील ! । वर्ष सुखाचें जाईल ॥
शाळेमध्ये मग जावें । पाटी - दप्तर पूजावें ॥

घरीं येउनी साऱ्यांनी । गोड धोड मग जेवोनी ॥
आनंदाने दिवस नवा । करा साजरा हा बरवा ॥
वर्ष सुखाचें बाळांना । जावो, विनती प्रभुचरणा ॥

* * *

# १३ : इरलें



आई ! आई ! ॥ सूप हें पहाया येई ॥ धृ० ॥
एका वेळीं दाणे किती गे ? ॥
मावतील तें मजला सांगे ? ॥
उचलिल कैसें कोण तयां गे ? ॥
कृष्णाबाई ॥ पेलेल सूप का आई ? ॥ १ ॥

इतुकें मोठें सूप कशाला ? ॥
हवें कुणाला न कळे मजला ॥
पैसे किती गे ! पडतिल याला ॥
कोण गे आई ? ॥ यांतून पांखडे बाई ? ॥ २ ॥

शब्द ऐकुनी निज बाळाचे ॥
कौतुक वाटे तिजला त्याचें ॥
हसूं येतसें त्या प्रश्नाचें ॥
म्हणे ती " बाळा ! ॥ अगदींच कसा रे भोळा ? ॥ ३ ॥

सूप नसे पाखडण्यासाठी ॥
असें बनविलें गरिबांसाठी ॥
पाउस पडतां घेण्यासाठी ॥
असें डोकीस ॥ घेतां न भिजे माणूस ॥ ४ ॥

खास असे ही शेतकऱ्यांची ॥
साध्या भोळ्या ह्या गरिबांची ॥
किंमत थोडी या वस्तूची ॥
आपुल्या हातें ॥ ही तयार करितां येते ॥ ५ ॥

हव्या कांबट्या सांगाड्याला ॥
पानें पळसाचीं बघ ह्याला ॥
दोऱ्या पानें बांधायाला ॥
उपयोगाची ॥ शेतावर खपणाऱ्यांची ॥ ६ ॥

एक आंकडा वर माथ्याला ॥
खिळ्यास याला टांगायाला ॥
सूप नसे हें, म्हणती याला– ॥
" इरलें " बाळा ॥ गरिबांच्या या छत्रीला " ॥ ७ ॥

* * *


# १४ : मिलिंदचा कुत्रा



जाशि कुठे चित्रा ? ॥ पाहण्या मिलिंदचा कुत्रा ॥
रंग कसा काय ? ।
पांढरा शुभ्र दिसतोय ॥
नखें किती त्याला ? ।
एकवीस दिसतातीं मजला ॥
केस कसे असती ?
भासते लोकर मउशी ती ॥
शेपुट किती मोठें ? ।
अगदी इवलेंसें छोटें ॥
आणि कसे डोळे ? ।
चमकती अंधरीं बुबुळें ॥
आजच पहिल्यांदा ।
पाहसी त्याला का चित्रा ? ॥
छे ! छे ! किती वेळां । पाहिला मिलिंदचा कुत्रा ॥

* * *


# १५ : मुंबईची सहल [ १ ]



जाऊं आपण मुंबईला। मुंबादेवी पहायला ॥
बाबुलनाथा पाहुं चला। महालक्ष्मी देवीला
चौपाटीवर मग जाऊं। पुतळा टिळकांचा पाहूं ॥
समुद्र पुढती दिसताहे। लाट धडधडा येताहे ॥
वाळूमध्ये खेळूं या। शंख-शिपले वेचूं या ॥
खाऊं "भेळ" मजेदार। आणि "कुलपी" चवदार ॥
बसूं विजेच्या गाडींत। फिरावया उपनगरांत ॥
सांताक्रुसला जाऊं या। विमानतळ मग पाहूं या ॥
विमान फिरतें आकाशीं। पत्र माणसें नेण्यासी ॥
आज एवढी मौज पुरे। पुन्हा उद्याला जाऊं रे ॥

* *

## १६ : चित्राचें ' बालमंदिर '




नवीन परकर नेसोनी। सुंदर चोळी घालोनी ॥
रिबिन बांधली वेणीला। रंग खुलवितो रूपाला ॥
गुलाबकलिका वेणींत। कशी डोलते झोकांत ॥
पाटी-पेन्सिल घेवोनी। डबा दप्तरीं ठेवोनी ॥
पोळी-भाजी खायाला। डब्यामधे मधवेळेला ॥
चित्रा आईला म्हणते। "बालमंदिरीं मीं जातें" ॥
सवें घेऊनि अंजीला। चित्रा जाई शाळेला ॥
ठोका पडला बाराचा। घड्याळांत या शाळेच्या ॥

ताराताई आल्या का ?। इंदूताई दिसती का ?
सीताबाई कुठे असे ?। पहा खेळ मी काढितसे ॥
जमलीं सारीं मुली-मुलें। छोटीं मोठीं तीं बाळें ॥
चला प्रार्थना म्हणायला। लागा मग अभ्यासाला ॥
सुट्टी खाऊची मधली। बालमंडळी ती जमली ॥
'वदनिं कवळ' तीं म्हणताती। डब्बे अपुले संपविती ॥
गाणीं-गोष्टी मग होती। खूष जाहलीं मुलें किती ॥
शाळा सुटतां हसत पुढे। चित्रा जाते घराकडे ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...................... वि: ..................
क्रमांक ...................... नों: दि: ..................

* * *

## १७ : मुंबईची सहल [२]



बाबा आम्हांला न्या हो । मुंबानगरीं फिरवा हो ॥
चला मुलांनो, सहलीला । बोरीबंदर पहायला ॥

ठणठण घंटा खणखणते । ट्राम समोरीं ती येते ॥
बसा चला त्या गाडींत । जाऊं राणीबागेंत ॥

नानापरिच्या पक्ष्यांना । किती पशूंना, सापांना ॥
पहावयाला ओळीने । जाऊं आपण मौजेने ॥

कोटामध्ये अता चला । उंच हवेल्या पहायला ॥
राजाबाई टॉवर तो । त्या बाजूस पहा दिसतो ॥
मजल्याच्या बसमधे बसा । गंमत पाहुनि तुम्ही हसा ॥
आगबोट ही किति मोठी । उभी बंदराच्या काठीं ॥
भारतांत तो येण्याचा । पहा समोरी दरवाजा ॥
त्यांतुन आंत प्रवेश करूं । समुद्रांत मौजेंत फिरूं ॥
बसा जाऊनी लॉंचमधे । फिरविल तुम्हां जलामधे ॥
चला बसोनी बग्गींत । हिंडूं या मग शहरांत ॥
विविध रूपाने नटलेली । मुंबानगरी देखियली ॥

* * *

# १८ : बाळांचा खेळ



होता छोटासा बाळ । हातीं घेई तो खेळ ॥
फळी लाकडी अन् चेंडू । छानदारशी विटि-दांडू ॥

" चल खेळाया चल बंडू । खेळूं आपण रे चेंडू " ॥
बोलावी तो बंडूला । बंडू आला खेळायाला ॥

बाळा हातीं बघ चेंडू । फळी घेतसे मग बंडू ॥
चेंडू खेळुनि ते दमले । ओटीवरती विसांवले ॥

" आता खेळूं विटि-दांडू " । बोले बाळाला बंडू ॥
वकट, लेंड, मूळ, नाळ । मोजुनि दमले बंडू, बाळ ॥

आई आली दाराशीं । गंमत वाटे बहु तिजशीं ॥
काम ठेवुनि हातींचें । कौतुक करिते बाळांचें ॥

" पुरें खेळणें आंत चला । खाऊ देतें खायाला ॥
हातपाय नी तोंड धुवा । जाइल तुमचा मग थकवा " ॥

बोल ऐकतां आईचा । खेळ संपला बाळांचा ॥
बशींत चकली अन् लोणी । आई आली घेवोनी ॥

खाऊ बघुनी हसतिं मुलें । पाणी तोंडाला सुटलें ॥
खाऊ खाउनिया सारा । बंडू जाई पळत घरां ॥

* * *

# १९ : वेणीवाला



आला वेणीवाला आला । आला हो आला ॥
या मुलींनो सुंदर वेण्या । घाला हो घाला ॥

झिप्री घालुनी हिरवीगार । शेवंती वेणी तेजदार ॥
दोन आण्यांला । दोन आण्यांला । घेतां का बोला ?॥

आबोलीची सुंदर वेणी । दिसाल मोहक ती माळोनी ॥
तीन आण्यांला । तीन आण्यांला । देऊं का बोला ? ॥

मदनबाण हा दिसे मनोहर । सुवास सुटला छान खरोखर ॥
चार आण्यांला । चार आण्यांला । देऊं का बोला ? ॥

नकोत वेण्या ? द्या मग गजरा । दाट गुंफिला सुबक साजरा ॥
पांच आण्यांला । पांच आण्यांला । घेतां का बोला ? ॥


सैल आंबाड्यावरि घाला । खास गजरा हा फुललेला ॥
सहा आण्यांला । सहा आण्यांला । देऊं का बोला ? ॥

या ग मुलींनो, या बहिणींनो । गजऱ्यासाठी रुसा सयांनो ॥
वेणीसाठी का हिरमुष्टी । जाऊं का बोला ? ॥

चालला वेणीवाला । चालला चालला हो चालला ॥
“ मोगरि अबोली ऽ ऽ ” देत आरोळी ॥
चालला हो चालला ॥

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३१... वि: काव्य
क्रमांक १४३१ नों: दि: १३/१०

* * *



## २० : पाखरांचें संमेलन

" आनंदाने कुठे जातीं सारीं पाखरें ? " ॥
बालमंदिरांत जाण्या निघाले सारे ॥

आंब्याच्या ग सावलींत भरतसे शाळा ॥
अभ्यासांत लक्ष नाही खेळतात खेळा ॥

काय यांच्या मंदिरांत धामधुम चाले ॥
जोड्या जोड्या करुनिया सारे चालले ॥

पाखरांचें छोट्या-मोठ्या संमेलन आजी ॥
पाहुणे ही जमा, मौज पहावया राजी ॥

गाणीं, गोष्टी, नाच आणिक नकला खेळ ॥
कार्यक्रमासाठी चार वाजतांची वेळ ॥

अध्यक्षांच्या खुर्चीवरी कोण डौलाने ? ॥
अगबाई ! माऊताई बसली ऐटीने ॥
मैनाराणी गाते गाणीं गोड कंठाने ॥
कोकिळा ही " कुहुकुहु " तारसुराने ॥
सुतारपक्षी " ठक्ठक् " करुनी ठेका धरितो ॥
पिसारा हा उभारूनी मोर नाचतो ॥
मिठू मिया गोडगोड घालितसे शीळ ॥
माणसाच्या आवाजाची करी नक्कल ॥
लक्ष देउनिया ऐके शब्द पोपट ॥
हुब्बेहुब नक्कल ती म्हणतसे पाठ ॥
गवळणीचा घरटा पहा किती सुबक ॥
कलाकुसरीचें काम दिसे मोहक ॥
आरशांत चिमणुताई रूप न्याहाळी ॥
गोंगाटाची खोड तिला फार निराळी ॥
कावळीचीं पोरें बाई गलिच्छ दिसती ॥
" काव काव " कर्कश तीं आवाज करीतीं ॥
कबुतरें कानगोष्टी मौजेने करितातीं ॥
" घु ऽ घु " आवाजासाठी पिंगा घुमवीतीं ॥
असा छान कार्यक्रम चालला समोर ॥
माऊताई जीभ चाटी पाहुनि शिकार ॥

कसाबसा धीर धरी एक-दोन तास ॥
खुर्चीचेंहि भान नाही सोडीतसे श्वास ॥

पाखरें की नाचण्यांत दंग झालेलीं ॥
टिपणी साधूनिया माऊताई घाला घाली ॥

खेळामध्ये गुंगलेलीं सावध मनीं तीं ॥
भुर्रकन् झाडावरीं उडोनिया जातीं ॥

फजित झाली माऊताई, "फिस फिस" करिते ॥
पिंजारुनी शेपटीचा गोंडा पळते ॥



REFBK-0011980
REFBK-0011980
११९८०
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
वि: ...
अनुक्रम 39४४४ नों: दि: 93/90/49
क्रमांक 9४39